# नियमित दिवाणी दावा क्र. ५६३/२०२५ मधील नि.क्र. १३ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांच्याविरुध्द पारीत झालेला नि.क्र. १ वरील विनाकैफियतीचा आदेश रद्द करुन मिळण्याबाबत दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ चे कथन की, प्रतिवादी क्र. १ दरम्यानच्या काळात अत्यंत आजारी असल्याकारणाने व प्रतिवादी यांचे वयदेखील खूप असल्याने तसेच त्यांना उठता बसता देखील येत नव्हते त्यामुळे सदर प्रतिवादीस न्यायालयात हजर राहणे शक्य नव्हते व कायद्याचे अपूर्ण ज्ञान असल्याने व वकिलांशी त्यांचा संपर्क झाला नाही. त्यामुळे, प्रस्तुत प्रतिवादीविरुध्द झालेला विनाकैफियतीचा आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र. १ ने अर्जासोबत दिलेली लेखीकैफियत व म्हणणे स्विकारुन सदर प्रतिवादीविरुध्द झालेला विना लेखीकैफियत आदेश रद्द करण्याची विनंती प्रस्तुत अर्जाद्वारे केली आहे.

३. वादीतर्फे प्रस्तुत अर्जावर अर्जाच्या पाठीमागे म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला आहे. वादीचे कथन की, प्रस्तुतचा अर्ज खोटा असून अर्जात नमूद केलेला मजकूराचे पुष्टयर्थ कोणताही पुरावा दिलेला नाही. सबब, प्रस्तुत अर्ज खर्चासही नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचे सुविद्य विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा दावा हा डिक्लरेशन व निरंतर ताकिद मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांची लेखीकैफियत मुदतीत दाखल न केल्यामुळे सदर प्रतिवादीविरुध्द नि.क्र. १ वर दि. ३०.०१.२०२६ रोजी विना लेखीकैफियत आदेश पारीत केला असल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र. १ यांनी अर्जात नमूद केलेले कारण

संयुक्तीक असल्याचे दिसून येत नसले तरी प्रस्तुत दावा गुणदोषावर निकाली होणे कामी प्रतिवादीस लेखीकैफियत दाखल करण्यासाठी संधी देणे न्यायाच्या दृष्टीने योग्य आहे. प्रतिवादी क्र. १ यांना झालेला विलंब विचारात घेता संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होत नाही. परंतु, प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास सदर प्रतिवादीचे नुकसान होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज सदर प्रतिवादीस झालेला विलंब विचारात घेता खर्चासह मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश :–

## आदेश

| | |
|---|---|
| १ | प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ याने वादीस खर्च रक्कम रु.३००/– (अक्षरी तीनशे रुपये) देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो. |
| २ | प्रतिवादी क्र. १ याने सदर खर्च रक्कम वादीला दिल्यानंतर प्रस्तुत प्रतिवादीविरुध्द नि.क्र. १ वर दि. ३०.०१.२०२६ रोजी झालेला विना लेखीकैफियत आदेश रद्दबातल ठरविण्यात येतो. |
| ३ | प्रतिवादी क्र. १ याने सदर खर्च रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी. |

ANAY DNYANESH KULKARNI

Digitally signed by ANAY DNYANESH KULKARNI
Date: 2026.03.05 17:53:26 +0530

दि. ०५/०३/२०२६

**(अनय ज्ञा. कुलकर्णी)**
तिसरे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
माढा.

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that, the contents of this P.D.F. file Order/Judgment is same word to word, as per the original order/judgment. | | |
| Name of Stenographer | : | M.P.Dixit Grade-3 |
| Court Name | : | 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Madha. |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 05/03/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 06/03/2026 |